"महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व वृध्द कलावंतांना मानधन" या योजनेस मान्यता आणि त्या अंतर्गत देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
शासन निर्णय क्र. समपएत-१०९० प्र.क्र. ३००/सांका-१.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई. दिनांक १६ मार्च, १९९१

वाचा :- शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्र. डीटीडब्ल्यू १२६५/एन, दिनांक ११ ऑगस्ट, १९६५.

शासन निर्णय :- शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक डीटीडब्ल्यू-१२६५/एन, दिनांक ११ ऑगस्ट, १९६५ अन्वये "महाराष्ट्र राज्यातील निर्धन लेखक आणि कलावंत यांना वित्तीय सहाय्य देण्याच्या योजनेस" शासनाने मंजूरी देऊन त्यानंतर या योजनेमध्ये वेळोवेळी बदल करण्यात आलेला होता. सदरहू योजनेतील नियमांचे सुसूत्रीकरण करण्याचे तसेच, त्या अंतर्गत देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. विचाराअंती शासन "महाराष्ट्र राज्यातील मान्यवर, वृध्द साहित्यिक व वृध्द कलाकारांना मानधन" या सुधारीत योजनेस मान्यता देत आहे. तसेच परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या या योजनेच्या नियमांसही शासन या शासन निर्णयान्वये मंजूरी देत आहे.

२. "महाराष्ट्र राज्यातील निर्धन लेखक व कलावंत यांना वित्तीय सहाय्य" या जुन्या योजनेंतर्गत हा शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकापूर्वी १९८९-९० व १९९०-९१ या आर्थिक वर्षासाठी ज्या कलाकारांना/साहित्यिकांना/कुटुंबियांना अर्थसहाय्य/तहहयात अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले गेले आहे अशा कलाकारांना/साहित्यिकांना/कुटुंबियांना "महाराष्ट्र राज्यातील मान्यवर, वृध्द साहित्यिक व वृध्द कलावंतांना मानधन" या सुधारीत योजनेंतर्गत खाली नमूद केल्याप्रमाणे अर्थसहाय्य मंजूर करण्यास शासन मंजूरी देत आहे :-

१] रु. ५५० ते रु. १२०० पर्यंत अर्थसहाय्य घेणाऱ्यांना रु. ३,६००/- वार्षिक
२] रु. १२०१ ते रु. २४०० पर्यंत अर्थसहाय्य घेणाऱ्यांना रु. ४,८००/- वार्षिक
३] रु. २४०१ ते त्यापेक्षा अधिक अर्थसहाय्य घेणाऱ्यांना रु. ६,०००/- वार्षिक

यासाठी चालू आर्थिक वर्षात येणाऱ्या जादा खर्च रु. ८३,१६,४००/-[रु. त्र्याऐंशी लाख सोळा हजार, चारशे फक्त] यांस शासन मंजूरी देत असून सदरहू खर्चापैकी रु. ४,२२,४००/[रु. चार लाख, बावीस हजार चारशे फक्त] हा खर्च उपलब्ध तरतुदीतून व रु. ७८,९४,०००/-[रु. अठ्ठयाहत्तर लाख चौऱ्यान्नो हजार फक्त] हा खर्च आकस्मिकता निधीमधून शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक आकनि-११९१/२५७/अर्थसंकल्प-५, दि. १६/३/१९९१ अन्वये मंजूर केलेल्या रु. ७८,९४,०००/- एवढ्या आगाऊमधून भागविण्यात येऊन हा सर्व खर्च "२२०५, कला व संस्कृति-[८००] इतर खर्च [एफ] साहित्य कला इत्यादी क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना वित्तीय

सहाय्य [२२०५ ०८५ २] -२० इतर खर्च" या लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात । आकस्मिकता निधी अग्री
अग्रीमामधून खर्च करताना सादर करण्यात येणाऱ्या देयकावर "आकस्मिकता निधी अग्री दिनांक १६-३-१९१
शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक-आप्रनि-११९१/२५७/अर्थसंकल्प-५, दिनांक १६-३-१९१ अन्वये मंजूर असे लाल शाईने लिहावे. अग्रीमामधून प्रत्यक्ष मासिक खर्च केल्याची आकस्मि माहिती, खर्च केलेल्या महिन्यानंतरच्या १५ तारखेपर्यंत वित्त विभागात पाठवावी.

३. सुधारित योजनेनुसार येणारा खर्च त्या त्या वर्षाअंतर्गत करण्यात आलेल्या तरतुद करण्यात यावा.

४. "महाराष्ट्र राज्यातील मान्यवर, वृध्द साहित्यीक व वृध्द कलावंताना मानधन" या सुधारीत योजनेंतर्गत मान्यवरांना अर्थ सहाय्य मंजूर करण्यासाठी परिशिष्ट ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे उच्च स्तरीय समितीची स्थापना करण्यास शासन या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देत आहे.

५. उच्च स्तरीय समितीमधील, अशासकीय सदस्यांचा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता, मुंबई नागरी सेवा नियम खंड-२ मधील परिशिष्ट ४२ [अ] येथील सेक्शन १, मधील १ [१] [बी] च्या तरतुदीनुसार व शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक टीआरए-१०७४/१०३२/एसईआर-५, दिनांक १.२.१९८४ च्या आधारे नियमित केला जावा. याच नियमाच्या तरतुदी केवळ रेल्वे/सडक प्रवासासाठी लागू असल्यामुळे तसेच, शासनाच्या काटकसरीच्या धोरणानुसार प्रथम श्रेणीच्या शासकीय अधिकाऱ्यांना विमान प्रवास खर्च करण्यावर बंदी असल्यामुळे अशासकीय सदस्यांना विमान प्रवास तसेच रेल्वेचा वातानुकुलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

६. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांनी या योजनेसाठी नियुक्त केलेल्या उच्च स्तरीय समितीने मान्यता दिल्याप्रमाणे कलाकारांना अर्थसहाय्य अदा करण्याची पुढील कार्यवाही करावी.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक:१७१/९१/व्यय-११, दिनांक १९.२.१९९१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

पत्र बं.कांबळे,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, समाजकल्याण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी.
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी.



Scanned with CamScanner

सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद

सर्व जिल्हा अधिकारी

महालेखापाल, महाराष्ट्र १ [लेखा व अनुज्ञेय लेखा परीक्षा],

अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

वित्त विभाग [व्यय ११] मुंबई.

वित्त विभाग [अर्थसंकल्प ३, अर्थसंकल्प १], मंत्रालय, मुंबई

सह संचालक [लेखा व कोषागार] संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला

मंत्रालयासमोर, मुंबई ३२ [दोन प्रती].

निवड नस्ती [कार्या १] समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग.

प्रपत्र "अ"

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग
क्रमांक एफएएस-१०९०/प्र.क्र.३००/सांका-१, दिनांक १५/३/९१ चे सहपत्र.

कलाकार व साहित्यिक यांना मानधन मंजूरीबाबतची नियमावली.

१. या योजनेस "महाराष्ट्र राज्यातील मान्यवर, वृध्द साहित्यिक व वृध्द कलावंतांना मानधन" असे संबोधण्यात यावे.

२. या योजनेखाली व्यक्तींना पात्र व श्रेणी ठरविण्याचे अधिकार शासनाने नियुक्त केलेल्या समितीस रहतील.

३. या योजनेखाली शासनाने नियुक्त केलेल्या समितीने पात्र ठरविलेल्या व्यक्तींना वार्षिक मानधन मंजूर करण्यात यावे.

४. पात्रतेच्या अटी खालीलप्रमाणे असतील

[अ] साहित्य व कलेच्या क्षेत्रात ज्यांनी मोलाची भर घातली अशी व्यक्ती.

[ब सांस्कृतिक कला आणि वाङ्मय क्षेत्रात ज्यांनी प्रदीर्घ व महत्वपूर्ण कामगिरी केलेली आहेत अशा व्यक्ती.

[क ज्या पुरुष कलाकाराचे व साहित्यिकाचे वय ५० वर्षापेक्षा जास्त व स्त्री कलाकाराचे व साहित्यिकाचे वय ५० वर्षे पेक्षा जास्त आहे अशा व्यक्ती मानधनास पात्र ठरतील.

[ड] कलाकार व साहित्यिक व कलाकार व साहित्यिक त्यांच्या विधवा पत्नी यांना तहहयात मानधन त्यांच्या हयातीपर्यन्त मानधन मिळेल.

[इ] जे कलाकार व साहित्यिक अतिशय आजारी असतील.
अर्धांगवायु, क्षय, कर्करोग, कुष्ठरोग हया रोगाने आजारी असतील व ज्यांना शारिरीक व्यंग असेल व त्यामुळे ते स्वतःचा व्यवसाय करु शकत नसतील अशा व्यक्ती व त्यांच्या बाबत वयाची अट असू नये.

५. मानधनाची रक्कम रु.३६०० ते ६००० पर्यन्त मंजूर करण्यात यावी. मानधन मंजूर करतांना खालीलप्रमाणे वर्गवारी असावी :-

| कलाकाराची/साहित्यिक टक्केवारी | वर्ग | रक्कम |
|---|---|---|
| १० टक्के | "अ" वर्गास | रु.६,०००/- |
| ३० टक्के | "ब" वर्गास | रु.४,८००/- |
| ६० टक्के | "क" वर्गास | रु.३,६००/- |

६. मानधनासाठी विनंती अर्ज करण्याची पध्दत –

मानधन मिळण्यासाठी संबंधीतांनी विनंती अर्ज सोबतच्या परिशिष्टा मध्ये दिलेल्या विहीत नमुन्यात संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नावे करावा.



Scanned with CamScanner

हा अर्ज दरवर्षी ३१ जुलै पर्यंत संबंधित जिल्ह्यातील समाजकल्याण अधिका-यांकडे पाठवावा. अर्जासोबत खालील कागदपत्रे सादर करावीत.

[अ] कलाकार, साहित्यिक वा त्यांच्या विधवा पत्नी अलिकडील पास पोर्ट आकाराचे राजपत्रित अधिका-याने प्रमाणित केलेले एक छायाचित्र.

[ब] त्यांच्या जन्म तारखेसंबंधीचा दाखला किंवा त्यासंबंधीचे तहसीलदार, सरपंच शासकीय [illegible] डॉक्टराने प्रमाणित केलेले अधिकृत कागदपत्र.

[क] कलाकार, साहित्यिक यांच्या कलाजीवनाबाबत व साहित्याबाबत त्या त्या क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, तज्ञ, संबंधित संस्था इत्यादींना किंवा ग्रामपंचायतीच्या सरपंचानी त्यांच्या विषयी प्रमाणित केलेली माहिती पहिल्या वर्षी अर्जासोबत सादर करावी. पुढे नुतनीकरणाच्या वेळी दरवर्षी देण्याची आवश्यकता नाही. तथापि दरवर्षी नुतनीकरणासाठी संबंधितानी विहीत नमुन्यात अर्ज करावा.

७. मानधनाबाबत संबंधित समाजकल्याण अधिका-यांनी पार पाडावयाची कर्तव्ये

कलाकार/साहित्यीक किंवा विधवा पत्नी यांनी मानधन मिळण्यासाठी विहित नमुन्यात केलेले अर्ज संबंधित समाजकल्याण अधिका-यांकडे मिळाल्यानंतर त्यांनी अर्जाची बारकाईने छाननी करावी व त्या अर्जावर त्याचे अभिप्राय देवून ३० सप्टेंबर पर्यंत किंवा जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत संचालक सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

८. आहरण व संवितरण प्राधिकारी - संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई, हे आहरण व संवितरण अधिकारी असतील. शासनाने नियुक्त केलेल्या समितीने मंजूर केलेल्या मानधनाची रक्कम संबंधित व्यक्तींना संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे मार्फत देण्यात यावी.

९. मानधनासाठी मुदत वाढ : या योजनेनुसार मानधन मिळणा-या व्यक्तींना मानधन मिळण्यासाठी मुदत वाढवून घ्यायची असल्यास चालू वित्तीय सहाय्य मिळण्याची विहीत केलेली मुदत संपण्यापूर्वी कमीत कमी दोन महिने आधी संबंधिताकडे अर्ज करावा. नुतनीकरणाची सोयी व साधी पध्दत ठेवावी.

१०. मानधनाची रक्कम : या योजनेखाली मानधनाची रक्कम वर्षातून दोनदा देण्यात येईल.

११. ज्या कलाकाराचे / साहित्यीकाचे सर्व मार्गांनी मिळून वार्षिक उत्पन्न रु.२४,०००/- पेक्षा जास्त नाही अशांना या योजनेचा लाभ घेता येईल. तथापि ज्या लाभार्थीने वार्षिक उत्पन्न रुपये २४,०००/- पेक्षा जास्त झाल्यास या योजनेखाली वर्षातने बंद करण्यात येतील.

१२. लाभार्थीची संख्या दरवर्षी प्राप्त होणा-या अर्जानुसार ठरविण्यात यावी.

१३. कलाकार व साहित्यीक यांना मानधन मंजूर करणेबाबत शिफारस करणेस या करिता शासनाने नेमलेली उच्च स्तरीय समिती सक्षम असेल.



Scanned with CamScanner

## प्रपत्र "ब"

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक-एफएमएस-१०९०/प्र.क्र.२००/सां.का.१, दिनांक १६ मार्च १९९१

महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक आणि कलावंत यांना मानधन शिफारस करण्यासाठी उच्च स्तरीय समितीचे सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | मंत्री, सांस्कृतिक कार्य | अध्यक्ष |
| २. | राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य | उपाध्यक्ष |
| ३. | सचिव, सांस्कृतिक कार्य | शासकीय सदस्य |
| ४. | अध्यक्ष अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद | अशासकीय सदस्य |
| ५. | अध्यक्ष, महाराष्ट्र शाहिरी परिषद, पुणे | अशासकीय सदस्य |
| ६. | अध्यक्ष, महाराष्ट्र तमाशा परिषद, पुणे | अशासकीय सदस्य |
| ७. | अध्यक्ष, अखिल भारतीय किर्तन संस्था, मुंबई | अशासकीय सदस्य |
| ८. | सचिव, सुरसिंगार संसद, मुंबई | अशासकीय सदस्य |
| ९. | सचिव, नालंदा नृत्य कला अकादमी | अशासकीय सदस्य |
| १०. | अध्यक्ष, मराठी चित्रपट महामंडळ कोल्हापूर | अशासकीय सदस्य |
| ११. | सचिव, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई | अशासकीय सदस्य |
| १२. | अध्यक्ष, तमाशा कला, कलावंत विकास मंदिर, मुंबई | अशासकीय सदस्य |
| १३. | अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी शाहिर परिषद, मुंबई. | अशासकीय सदस्य |
| १४. | संचालक, सांस्कृतिक्कार्य. | सदस्य-सचिव |

Scanned with CamScanner